महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १९४ वा | दिनांक : २२/०५/२०२५ | वार : गुरूवार

## शत्रूला सांगून हल्ला करणे हे देशप्रेमाचे लक्षण आहे का? विजय वडेट्टीवार



**मुंबई** : शत्रूराष्ट्राला सांगून त्याच्यावर हल्ला करणे हे देशप्रेमाचे लक्षण आहे का? असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधताना उपस्थित केला आहे. केंद्राने पाकला कळवून अतिरेकी अड्ड्यांवर कारवाई केली. आम्ही तिकडे कारवाई करणार आहोत, त्यामुळे तेथून तुमचे अतिरेकी व सैन्य हलवा, मग आम्ही रिकाम्या जागेवर हल्ला करतो असा याचा अर्थ होतो, असे ते म्हणालेत.

काँग्रेसने बुधवारी सद्भावना दिनानिमित्त चंद्रपूर येथे तिरंगा रॅली काढली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त प्रश्न उपस्थित केला. तसेच पुलवामा हल्ल्यात वापरण्यात आलेले २५० किलो आरडीएक्स कुठून आले याचा शोध अद्याप लागला नसल्याचा आरोपही केला. ते म्हणाले, लोकशाही जनतेला व विरोधकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. राहुल गांधी यांनी प्रश्न विचारताच सरकार ते सैन्याचा अपमान असल्याचा आरोप करते. या देशात भाजपला सैन्याचा अभिमान केव्हापासून वाटू लागला आहे?

पुलवामा हल्ल्यावेळी २५० किलो आरडीएक्स कुठून आले? ते कुणी आणले? आणणारे कोण होते? याचा शोध अद्यापही लागला नाही. पहलगाममध्ये अतिरेकी हल्ला करणारे ४ अतिरेकीही अजून सापडले नाहीत. आपण सीमापार लढाई केली, पण भारतात लपलेल्या या अतिरेक्यांचा शोध लागला नाही. आम्ही याविषयी प्रश्न केला केला तर आम्हाला देशद्रोही ठरवले जाते. आमच्यावर सैन्यदलांचा अवमान केल्याचा आरोप केला जातो. पण या देशात तिरंग्याचा सर्वाधिक अवमान करणारे कोण आहेत? हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे आम्ही आजच्या तिरंगा रॅलीद्वारे सैनिकांच्या शौर्याला सलाम केला.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केंद्राने पाकला कळवून त्याच्यावर हल्ला केल्याचाही आरोप केला. ते म्हणाले, सरकारने पाकला कळवून अतिरेकी अड्ड्यांवर कारवाई केली. आम्ही तिकडे कारवाई करणार आहोत, त्यामुळे तेथून तुमचे अतिरेकी व सैन्य हलवा, मग आम्ही रिकाम्या जागेवर हल्ला करतो असा याचा अर्थ होतो. हाच प्रश्न आमच्या पक्षाने सरकारला विचारला. त्यात काहीच चूक नाही. एखाद्या देशाला असे सांगून हल्ला करणे योग्य आहे का? हे देशप्रेमाचे लक्षण आहे का? या सर्व गोष्टी जनतेपर्यंत पोहोचण्याची गरज आहे.

ते पुढे म्हणाले, केंद्रात मागील १० वर्षांपासून मोदी सरकार आहे. पण पाकविरोधात युद्ध सुरू झाले तेव्हा एकाही देशाने आपल्याला मदत किंवा पाठिंबा दिला नव्हता. ही अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. आपल्या शेजारी देशांनीही आपल्याला मदत करण्याची तयारी दर्शवली नाही. ज्या देशांना आपण मदत केली, त्या देशही आपल्यासोबत उभे टाकले नाही. या स्थितीत विविध देशांत शिष्टमंडळ पाठवून सरकार सर्वांसोबत संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. देर आये दुरुस्त आये असा हा प्रकार आहे. त्यातून काय फायदा होईल हे काळच ठरवेल. पण आपले परराष्ट्र धोरण चांगले नव्हते, आपले कुणाशी संबंध चांगले नव्हते, हे ऑपरेशन सिंदूरनंतर प्रकर्षाने दिसून आले.

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी भारत-पाकमध्ये झालेल्या शस्त्रसंधीवरुनही केंद्रावर निशाणा साधला. भारताने अमेरिकेच्या इशाऱ्यानंतर शस्त्रसंधी केली. त्यानंतर पाकने आपला सैनिक परत केला. आपणही त्यांचा सैनिक परत पाठवला. लोकशाहीत सरकारला आपले किती नुकसान झाले? आपले किती जवान मारले गेले किंवा जखमी झाले? किती राफेल विमानांचे नुकसान झाले? असे प्रश्न करण्यात काय चुकीचे आहे.

पाकने भारतावर चिनी बनावटीच्या ५ हजार ड्रोनद्वारे हल्ला केला. त्यांच्या एका ड्रोनची किंमत १५ हजारांच्या आसपास आहे. हे एक ड्रोन पाडण्यासाठी आपण १५ लाख रुपयांचे क्षेपणास्त्र डागले. आत्ता यामागे चीनचे डावपेच असल्याचा दावा केला जात आहे. मला वस्तुस्थिती माहिती नाही. पाकने आपली ४ राफेल विमाने पडल्याचीही चर्चा आहे. त्यामुळे सरकारने या प्रकरणी स्थिती स्पष्ट करण्याची गरज आहे. युद्धानंतर स्थिती स्पष्ट करण्यात काही कमीपणा किंवा चुकीचे आहे असे मला वाटत नाही. युद्धात शस्त्रसंधी झाल्यानंतर रॅली काढून ते जिंकल्याचे सांगितले जात आहे. असा प्रकार पहिल्यांदाच देशात होत आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.




## उद्धव ठाकरे एकत्र यायला तयार, राज ठाकरेंनी निर्णय घ्यावा : अनिल परब



**मुंबई** : शिवसेना ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी दोन ठाकरे बंधू पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चेबाबत सूचक वक्तव्य केले आहे. उद्धव ठाकरेंनी सांगितलंय, सगळे वाद बाजूला ठेवून एकत्र यायला तयार आहोत, आता आमच्या सोबत एकत्र यायचं की नाही, हे राज ठाकरे यांनी ठरवायचे आहे, असे अनिल परब म्हणाले. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा रंगल्या आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे तसेच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे युती करणार असल्याचे बोलले जात आहे. राज ठाकरे यांनी नुकतेच एका पॉडकास्टमध्ये बोलताना उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीवर भाष्य केले होते. महाराष्ट्रासमोर आमची भांडणे किरकोळ आहेत. महाराष्ट्रासाठी आम्हाला एकत्र येण्यात काहीच अडचण नाही, असे ते म्हणाले होते. यानंतर उद्धव ठाकरे यांनी देखील त्यांच्या भाषणात आम्ही पण भांडणे बाजूला ठेवायला तयार आहोत, असे म्हणत सकारात्मक प्रतिसाद दिला. आता अनिल परब यांनी केलेल्या विधानामुळे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

मराठी लोकांच्या मनात दोन ठाकरे एकत्र यावेत यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. आम्ही चर्चेची दार कधीच बंद केली नाहीत, असे विधान आमदार अनिल परब यांनी केले आहे. दोन्ही प्रमुख नेते भेटतील चर्चा करतील आणि ठरवतील. दोन्ही सेनेमध्ये पक्ष नेतृत्व जो निर्णय घेतील त्यानुसार पुढे जाऊ. जशा निवडणुका जवळ येतील तसे दोन नेते निर्णय घेतील. मी छोटा नेता आहे. दोघे नेते बसतील आणि ठरवतील, असेही परब यांनी म्हटले आहे.

पुढे ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी सांगितले आहे की, सगळे वाद बाजूला ठेवून सोबत यायला तयार आहोत. आता आमच्या सोबत एकत्र यायचे की नाही, हे राज ठाकरे यांनी ठरवायचे आहे. महाराष्ट्र हितासाठी त्यांनी ठरवावे आम्ही चर्चेसाठी सकारात्मक आहोत.

अनिल परब यांनी छगन भुजबळ यांच्या मंत्रिपदावर प्रतिक्रिया दिली. शेवटी भाजपने ज्याचा सतत विरोध केला होता, तो विरोध झुगारुन छगन भुजबळ यांना मंत्रीपद दिले असे ते म्हणाले. भाजप आपल्याच भूमिकेला तिलांजली देत असल्याची टीका त्यांनी केली. हे सरकार राक्षसी बहुमतात आहे, भाजप कार्यकर्ते दु:खी आहेत, त्यांनी मेहनत करून सत्तेत येऊन सुद्धा काही फायदा होत नाही. त्यामुळे कटशाह करण्याचा काम या सरकारमध्ये सुरु आहे. पालक मंत्रीपद आणि वेगवेगळी गणित मांडण्यात त्यांचा वेळ जातोय, अशा शब्दांत अनिल परब यांनी भाजपवर निशाणा साधला.

सर्वोच्च न्यायालयाने जे जजमेंट दिले आहे, त्यानुसार उर्वरित महाराष्ट्र ओबीसीचा निर्णय न्यायालयाने लावला आहे. जिल्हा परिषद, नगर पंचायत निवडणुका त्यांना ४ महिन्यांत घ्याव्या लागतील. मुंबई महापालिका निवडणुकीत आरक्षणाचा विषय नाही. याठिकाणी फक्त जागा २२७ की २३६ हाच प्रश्न होता. यावर कुठलाही स्टे नाही. उद्याही निवडणूक ते घेऊ शकतात. त्यांचा प्रशासक बसला आहे हवे ते करु शकतात. प्रशासकाच्या माध्यमातून हवे तसे काम त्यांना करता येते, मुंबई महापालिका लुटता येते, अशी टीकाही अनिल परब यांनी भाजपवर केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ मे २०२५


## सोलापूरमध्ये काँग्रेसला मोठा धक्का : माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रेंनी पक्षाचा हात सोडला



**सोलापूर :** सोलापूरमधील काँग्रेसचे नेते सिद्धाराम म्हेत्रे हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यांनी नुकतीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. ३१ मे रोजी आपण शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे सिद्धाराम म्हेत्रे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सिद्धाराम म्हेत्रे यांचा शिवसेनेतील प्रवेश हा काँग्रेससाठी मोठा हादरा मानला जात आहे.

सिद्धाराम म्हेत्रे हे काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्यातील प्रभावशाली आणि अनुभवी नेते मानले जातात. त्यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे, तसेच गृहराज्यमंत्री पदाची जबाबदारीही यशस्वीरित्या सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे काँग्रेसने सोलापूर जिल्ह्यात आपली पकड मजबूत ठेवली होती. मात्र आता त्यांनी थेट एकनाथ शिंदेंची भेट घेतल्यामुळे जिल्ह्यातील राजकारणात एक नवे वळण येण्याची शक्यता आहे.

काँग्रेसने मला भरपूर काही दिले, पण मागच्या काही वर्षात ज्या पद्धतीने ताकद द्यायला पाहिजे होती ती दिली नाही. कार्यकर्त्यांना अनेक प्रकारे त्रास होत होता, त्यामुळे काहीतरी निर्णय घ्या, असा कार्यकर्त्यांचा आग्रह होता. एकनाथ शिंदे साहेबांच्या सोबत गेले पाहिजे असे कार्यकर्त्यांनी सांगितले त्यामुळेच हा निर्णय घेतला, असे सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले. ३१ मे रोजी एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीमध्ये अक्कलकोटमध्ये प्रवेश होईल असेही त्यांनी सांगितले.

सुशीलकुमार शिंदे, प्रणिती शिंदे यांच्याबद्दल मला काहीही बोलायचे नाही. ज्या पद्धतीने सचिन कल्याण शेट्टी यांना त्यांच्या पक्षाने ताकद दिली, तशी ताकद काँग्रेसकडून मिळाली नाही. आमच्या कार्यकर्त्यांना अनेक प्रकारे त्रास तालुक्यात दिला जात होता. तो थांबला पाहिजे म्हणून हा प्रवेश आहे. जर दिला जाणारा त्रास थांबला नाही, तर मित्रपक्षांत देखील संघर्ष मला करावा लागणार आहे. दुश्मन से दोस्ती हर हाल में अच्छी असे म्हटले जाते. त्यामुळे ही दोस्ती देखील आम्ही करून बघू. पण जर त्रास थांबला नाही, तर संघर्षही करावा लागेल असे ते म्हणाले. या संदर्भात माझे सुशीलकुमार शिंदे किंवा प्रणिती शिंदे यांच्याशी कोणतेही बोलणे झालेले नाही, असेही सिद्धाराम म्हेत्रे म्हणाले.

सिद्धाराम म्हेत्रे हे राज्याचे माजी गृहराज्यमंत्री होते. अक्कलकोट येथे म्हेत्रे घराण्याची मोठी ताकद आहे. ते काँग्रेसच्या तिकिटावर ४ वेळा अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले आहेत. सुशीलकुमार शिंदे यांचे निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख आहे. वडिलांपासून ते काँग्रेसशी एकनिष्ठ आहेत.

मात्र, २०१९ नंतर अक्कलकोटच्या राजकारणात एक मोठा बदल घडला. भाजपचे सचिन कल्याणशेट्टी आमदार म्हणून निवडून आल्यानंतर सिद्धाराम म्हेत्रे यांची राजकीय ताकद कमी होत गेली. सलग दोन विधानसभा निवडणुकांमध्ये पराभवाच्या धक्क्यांनी त्यांच्या गोटात निराशा पसरली. त्यातच त्यांच्या नेतृत्वाखालील साखर कारखाना आणि इतर सहकारी संस्था अडचणीत होत्या.

राज्यातील काँग्रेसचे अनेक नेते, पदाधिकारी पक्षाला सोडचिठ्ठी देत असल्याचे पाहायला मिळत आहे. रवींद्र धंगेकर यांनी काही महिन्यांपूर्वी काँग्रेसला राम राम ठोकत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. आता सिद्धराम म्हेत्रे यांच्यासारख्या बड्या नेत्यानेही काँग्रेसचा हात सोडला आहे. यामुळे स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका होण्यापूर्वी काँग्रेसची ताकद कमीकमी होत असल्याचे म्हटले जात आहे.

## कपिल शर्मा शोचे फोटोग्राफर दास दादांचे निधन



कपिल शर्मा शोचे असोसिएट फोटोग्राफर दास दादा यांचे निधन झाले. कपिल शर्माच्या टीमने इंस्टाग्रामवर एक भावनिक व्हिडिओ शेअर करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. विनोदी कलाकार कपिल शर्मा भावुक झाला आणि म्हणाला की त्यांची अनुपस्थिती नेहमीच जाणवेल.द कपिल शर्मा शोचे छायाचित्रकार दास दादा यांचे खरे नाव कृष्णा दास होते. कपिल शर्माच्या टीमने सोशल मीडियावर त्यांच्या निधनाची माहिती दिली आहे. त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला आहे, जो वेगवेगळ्या भागांमधून संकलित केला आहे.

कपिल शर्मानेही व्हिडिओ शेअर केला आहे आणि म्हटले आहे की - आज माझे मन खूप दु:खी आहे. आम्ही दास दादा गमावले. ज्यांनी द कपिल शर्मा शोच्या सुरुवातीपासून असंख्य क्षण आपल्या कॅमेऱ्यात कैद केले.

विनोदी कलाकार आणि अभिनेता किकू शारदाने त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर ही पोस्ट शेअर करून दास दादा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्याने लिहिले आहे- दास दादा, आम्हाला तुमची आठवण येईल.

दास दादांच्या पत्नीचे गेल्या वर्षीच निधन झाले. असे म्हटले जाते की यानंतर त्यांना हृदयरोग झाला. यामुळे ते काम करू शकत नव्हते.

दास दादा यांना 2018 मध्ये दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. जरी त्यांनी पडद्यामागे काम केले असले तरी कपिल शर्मा अनेकदा त्यांना स्टेजवर बोलावत असे आणि त्यांच्याशी विनोद करत असे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ मे २०२५


## कन्नड लेखिका बानू मुश्ताक यांना बुकर सन्मान



77 वर्षीय बानू मुश्ताक आणि अनुवादक दीपा भाष्टी यांना मंगळवारी त्यांच्या 'हार्ट लॅम्प' या पुस्तकासाठी 2025 चा आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारासह त्यांनी केवळ 50,000 युरोची बक्षीस रक्कम जिंकली नाही तर इतिहासही रचला. मूळ कन्नड भाषेत लिहिलेल्या पुस्तकाला हा पुरस्कार पहिल्यांदाच देण्यात आला आहे.

लघुकथांच्या संग्रहाला हा पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे आणि भारतीय अनुवादकाला अनुवादासाठी बुकर पुरस्कार मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी 2022 मध्ये, गीतांजली श्री यांना 'टॉम्ब ऑफ सँड' साठी हा पुरस्कार मिळाला होता.

'हार्ट लॅम्प' हा 1990 ते 2023 दरम्यान वकील आणि कार्यकर्त्या बानू मुश्ताक यांनी लिहिलेल्या 12 लघुकथांचा संग्रह आहे. यात मुस्लिम महिलांच्या दैनंदिन जीवनातील कथा आहेत. या कथांद्वारे त्या पितृसत्ताक विचारसरणी, धार्मिक निर्बंध आणि लिंगभेद याबद्दल बोलतात.

त्यांच्या कथांद्वारे, मुश्ताक देशातील बहुतेक महिलांना त्यांच्या घरात जाणवणाऱ्या गुदमरल्यासारखे कथन करते.

मुश्ताक म्हणतात की त्यांना या कथा लिहिण्याची प्रेरणा त्यांच्या वकिलीच्या दिवसांपासून मिळाली. जेव्हा त्या प्रॅक्टिस करत होत्या, तेव्हा अनेक महिला त्यांच्या घरगुती समस्या आणि केसेस घेऊन त्यांच्याकडे येत असत.

बानू मुश्ताक यांचा जन्म 1948 मध्ये कर्नाटकातील हसन येथे झाला.

त्यांनी त्यांचे प्रारंभिक शिक्षण कन्नड भाषेतील मिशनरी शाळेतून घेतले. यानंतर, त्यांनी समाजाशी भांडण केले आणि विद्यापीठातही गेल्या. वयाच्या 26 व्या वर्षी त्यांनी प्रेमविवाह केला. कन्नड व्यतिरिक्त, त्यांना हिंदी, उर्दू आणि इंग्रजी भाषांचे चांगले ज्ञान आहे.

बानू मुश्ताक यांनी लंकेश मासिकात रिपोर्टर म्हणून काम केले आहे. याशिवाय त्यांनी बंगळुरूमधील ऑल इंडिया रेडिओमध्येही काम केले आहे. वयाच्या 29 व्या वर्षी त्या आई झाल्या. त्यानंतर, त्यांनी प्रसूतीनंतरच्या नैराश्यात लिहायला सुरुवात केली. 1999 मध्ये त्यांना कर्नाटक साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

1980 पासून, त्या सक्रियतेच्या माध्यमातून आपला आवाज उठवत आहे. 2000 मध्ये, त्यांच्या कुटुंबाला समाजाने बहिष्कृत केले. मुश्ताक यांची सक्रियता हे याचे कारण होते. त्या मुस्लिम महिलांना मशिदीत प्रवेश देण्याची परवानगी मागत होत्या. त्या शाळांमध्ये मुस्लिम मुलांनी हिजाब घालण्याच्या बाजूने राहिल्या आहे.

'हार्ट लॅम्प' चे इंग्रजीत भाषांतर करणाऱ्या दीपा भाष्टी म्हणतात की त्यांना पुस्तके आणि कथांबद्दलची आवड त्यांच्या आजीकडून मिळाली. आजी मला दिवसभरात 3-4 गोष्टी सांगायची. कधीकधी ती कथांमधील पात्रांसारखी वागायची तर कधीकधी ती आवाज बदलून एकाच वेळी अनेक पात्रे साकारायची.

दीपा म्हणतात की आजही जेव्हा मी माझ्या आजीबद्दल विचार करते तेव्हा मला आश्चर्य वाटते. त्यांच्यामुळेच आज मी कथा लिहू आणि भाषांतर करू शकते.

## पोलीसाने सराफाकडून ८ लाखांचे दागिने घेतले



**पुणे :** पुणे पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नावाचा गैरवापर करून पोलिस हवालदाराने सराफाकडून 8 लाख 22 हजार 220 रूपयांचे दागिने खरेदी केले होते. त्यानंतर सराफाने दागिन्यांचे पैसे मागितल्यामुळे टाळाटाळ करीत त्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पोलिस हवालदाराला निलंबित केले आहे. गणेश अशोक जगताप (नेमणूक-विशेष शाखा) असे निलंबित केलेल्या हवालदाराचे नाव आहे. पोलिस उपायुक्त मिलींद मोहिते यांनी त्यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत.

पोलिस गॅझेटमधील आदेशानुसार, हवालदार गणेश जगताप यांची मुख्यालय ते विशेष शाखा अशी बदली 31 जानेवारी 2024 मध्ये झाली होती. ते संबंधित शाखेत हजर न होता, ते 6 फेब्रुवारी 2024 पासून रूग्णनिवदेन रजेवर गेले होते. त्यानंतर 21 ऑगस्ट 2024 मध्ये जगतापने तक्रारदार सराफा मनीष सुरेश सोनिग्रा (रा. भवानी पेठ) यांच्या नवकार ज्वेलर्स शॉपमधून 8 लाख 22 हजार 220 रूपयांचे सोन्याचे दागिने खरेदी केले. दागिने खरेदीवेळी जगतापने पोलिस दलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नावाचा गैरवापर केला. त्यानंतर मनीषला दागिन्यांचे पैसे देण्यास टाळाटाळ केली. तक्रारदार मनीषने दागिन्यांच्या पैशांची मागणी केली असता, जगतापने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबतचा कसुरी अहवाल विशेष शाखेला प्राप्त झाला होता. बेजबाबदार, नैतिक अध:पतनाचे गैरवर्तन केल्याप्रकरणी हवालदार गणेश जगताप यांना निलंबित केले आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २२ मे २०२५

# अकरावी प्रवेशाला सुरुवात : पहिल्याच दिवशी संकेतस्थळ ठप्प



**मुंबई :** अकरावीच्या प्रवेशासाठी प्रत्यक्ष अर्ज भरण्याची प्रक्रिया बुधवारी सकाळपासून सुरू झाली, मात्र प्रवेशासाठीचे अधिकृत संकेतस्थळ ठप्प झाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला. या संदर्भात शिक्षण संचालनालयाच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता, संकेतस्थळाचे तांत्रिक काम सुरू असून लवकरच ते सुरळीत सुरू होईल, अशी माहिती देण्यात आली.

यंदा दहावीच्या परीक्षेत राज्यभरातून 13,02,873 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या अकरावी प्रवेशासाठी राज्यात एकूण 20,91,390 जागा उपलब्ध आहेत. प्रवेशप्रक्रियेची सुरुवात 21 मे रोजी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यावर्षी प्रथमच संपूर्ण राज्यात अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यापूर्वी ही प्रक्रिया फक्त मुंबई, पुणे-पिंपरी चिंचवड, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका क्षेत्रांपुरती मर्यादित होती.

यंदापासून संपूर्ण राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, ही प्रक्रिया सुरळीत पार पडेल की नाही, याबाबत शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांकडून आधीपासूनच शंका व्यक्त करण्यात येत होत्या. त्या शंका प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी खरी ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

बुधवारी सकाळपासून अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ उघडण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यावेळी संकेतस्थळ ठप्प असल्याचे निदर्शनास आले. सुरुवातीला संकेतस्थळावर '502 Bad Gateway' असा संदेश दिसत होता, तर नंतर दुपारी 'संकेतस्थळाचे काम सुरू आहे' असा संदेश झळकू लागला. त्यामुळे सकाळपासून सायबर कॅफे किंवा घरातील संगणकासमोर अर्ज भरण्यासाठी बसलेले विद्यार्थी आणि पालक मानसिक त्रासाला सामोरे गेले.

या प्रक्रियेत काही समस्या आल्यास संकेतस्थळावर हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला आहे. पालक व विद्यार्थ्यांनी या क्रमांकावर संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु तोही निरुपयोगी असल्याचे दिसत आहे. कुठल्याच प्रकारचा संपर्क झाला नाही. त्यामुळे नेमके काय झाले आहे, याची काहीच कल्पना येत नसल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू, मार्गदर्शक, उत्कृष्ट प्रशासक, आदरणीय प्रो. डॉ. संजीव सोनवणे सर यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाच्या वतीने सपत्नीक सत्कार करताना प्राचार्य डॉ. हसन इनामदार सोबत विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक भटू प्रसाद पाटील सर आणि सौ. पाटील मॅडम दिसत आहेत.

# ४ महिन्यांत १ हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या : विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी दिली माहिती



**मुंबई :** यंदा जानेवारी ३० एप्रिलपर्यंतच्या ४ महिन्यांच्या कालावधीत विविध नैसर्गिक आपत्तीमुळे ५४ हजार ५३३ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. त्यामुळे राज्यातील १ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपली जिवनयात्रा संपवली, अशी माहिती विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बुधवारी दिली. त्यांनी यावेळी बाधित क्षेत्राचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणीही केली.

अंबादास दानवे म्हणाले, मार्च २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या विविध नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना एकूण १३ हजार ८१९ कोटी रुपये वाटप होणे अद्याप बाकी आहे. सरकार पीक कापणी प्रयोगावर आधारित या एकाच निकषावर पीक विम्याची एकदाच भरपाई देणार आहे. हे अन्यायकारक आहे. आम्ही या विरोधात आवाज उचलणार आहोत. गेल्या काही दिवसांत राज्यातील विविध जिल्ह्यांवर मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्ती कोसळली. पण त्यानंतरही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे.

दानवे म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार बीडचे पालकमंत्री झाले. पण त्यानंतरही तेथील गुन्हेगारी घटनांवर अंकुश लागला नाही. परळीमध्ये शिवराज दिवटे या तरुणाला मारहाण झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे तेथील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाल्याचे दिसून येत आहे.

दानवे पुढे म्हणाले, केंद्राकडून महाराष्ट्र राज्याला २०२३ - २४ मध्ये ३६ हजार कोटींचा निधी मिळाला. तो २०२४ -२५ मध्ये ३१, ८३० कोटी रुपयांवर घसरला. त्यामुळे डबल इंजिन सरकारला केंद्राची साथ खरी मिळते का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सोलापूर एमआयडीसीत लागलेल्या आगीत जखमींना रुग्णालयात नेण्यासाठी पंढरपूरहून रूग्णवाहिका आणावी लागली. यावरूनही दानवे यांनी राज्यातील एकूण एमआयडीसींच्या सुरक्षा व उपाययोजनांबाबत ताशेरे ओढले.

जनतेचा विरोध असताना ही विविध विकासकामांच्या नावाखाली सामान्य नागरिक व शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहण करण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहे. राज्यात गुत्तेदारांचे साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे, असे ते म्हणाले.

देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या राजशिष्टाचारात सरकारने निष्काळजीपणा केला. सरन्यायाधीशांनी स्वतः याविषयी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर सरकारने पत्रक काढले. या चुकीवर पांघरूण घालून चालणार नाही. चुकीला माफी नाही. आम्ही या प्रकरणी ठोस भूमिका घेऊ, असेही अंबादास दानवे यावेळी बोलताना स्पष्ट केले.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903